नि.दि.दा.क्र.३३/२०१४
मारोती विरुद्ध सोमा
निशाणी – ६८ खाली

**उलटतपास प्रतिवादींतर्फे श्री. आर. आर. सोंडवले वकील यांच्या मार्फत**

०४. आज न्यायालयात साक्ष देण्याकरिता मला न्यायालयाचा साक्ष समंस प्राप्त झालेला आहे. मी मौजा नेरी येथील नगर भूमापन क्र.३९१ व ३९३ यांची संयुक्त मोजणी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदरची मोजणी ही कोर्ट कमिशन मार्फत होती. हे म्हणणे खरे आहे की, सदरची मोजणी ही नगर भूमापन क्र.३९१ व ३९३ चीच होती.

०५. मी प्रचलित नकाशावरील कायम खुणांच्या आधारे मोजणी केली होती. सदरची मोजणी मी अभिलेखावरील विहीरीच्या आधारे केली होती. हे म्हणणे खरे आहे की, मोजणीच्या वेळी ती विहीर रस्त्यावर होती. विहीरनंतर पहिलं स्थळ नगर भूमापन क्र.३९३ आहे. नगर भूमापन क्र.३९३ हे मारोती मडु खाटे, संभा मडु खाटे व मोतीराम मडु खाटे यांचे आहे. भूमापन क्र.३९३ नंतर भूमापन क्र.३९२ आहे व त्यानंतर भूमापन क्र.३९१ आहे. हे म्हणणे खरे आहे की, भूमापन क्र.३९२ ची मोजणी करण्याचा मला आदेश नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, तरी मी भूमापन क्र.३९२ ची मोजणी केली.

०६. भूमापन क्र.३९१ व भूमापन क्र.३९३ च्या मध्ये भूमापन क्र.३९२ आहे. त्यामुळे जरी भूमापन क्र.३९१ व भूमापन क्र.३९३ च्या पॉइंटप्रमाणे मोजणी केली असता आपोआप भूमापन क्र.३९२ ची मोजणी होते. म्हणून मी भूमापन क्र.३९२ ची सुध्दा मोजणी केली. हे म्हणणे खरे आहे की, भूमापन क्र.३९१ व भूमापन क्र.३९३ ची मोजणी केली असता मधातला भूमापन क्र.३९२ आपोआप खुडवल्या जातो.

०७. मोजणी करतेवेळी जसे सोईस्कर व सोपे होईल त्या अंतरावर प्लेनटेबल शिफ्ट केल्या जातात. हे म्हणणे खरे आहे की, मोजणीमध्ये वादीच्या जागेवर प्रतिवादींचा कब्जा आहे असे मी दाखविलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्याचप्रकारे वादीची किती जागा आहे हे सुध्दा मी दाखविलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, भूमापन क्र.३९२ ची मोजणी मी वादीच्या सांगण्यावरुन कुठलाही न्यायालयाचा आदेश नसतांना खोटी केली आहे. हे म्हणणे खरे नाही

की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण
फेरतपास नाही

श्रवणोत्तर स्विकृत
माझ्या समक्ष

ठिकाण – चिमूर
दिनांक १८/०३/२०२६

(आर. डी. भुयारकर)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, चिमूर